<u>**नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १३९ खाली आदेश**</u>

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. त्यापैकी वादी क्र. १ इ सौ. मंगल बाळू धोत्रे हे दि. २९/१०/२०१२ रोजी मयत असलेबाबत रिपोर्ट मे. न्यायालयामध्ये दाखल झालेला आहे. सदर वादी क्र. १ इ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे.

०३. तसेच प्रतिवादी क्र. १ कृष्णा तुकाराम शेटे हे दि. २८/०७/२०२० रोजी झाले असून त्यांचे वारसही दाव्याचे कामकाज पुढे चालवणेसाठी रेकार्डवर घेणे आवश्यक आहे. वादी क्र. १ इ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ११ वर्षे ५० दिवस व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ३ वर्षे ४ महिने २२ दिवस एवढा उशीर झालेला आहे. सबब, सदर वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशिर माफ करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०४. सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. मयत वादी नं. १ इ ही मयत वादीची मुलगी होती. मयत वादींना त्यांची मुलगी मयत असल्याचे माहिती होती. उशिर माफीसाइी या अर्जामध्ये कोणतेही कारण दिले नाही. हा अर्ज कोणत्या कारणास्तव दिला त्याचाही उल्लेख नाही. सबब, सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. वादींचा युक्तीवाद ऐकला. वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस

असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी वादी क्र. १ इ सौ. मंगल बाळू धोत्रे हे दि. २९/१०/२०१२ रोजी व प्रतिवादी क्र. १ कृष्णा तुकाराम शेटे हे दि. २८/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत असे वादीने नमुद केले आहे.

**०६.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालविणे अधिकच सोयीचे होईल. वाया गेलेले वेळेबाबत भरपाई म्हणून वादी यांना कॉस्ट देणे न्यायोचित ठरेल. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज कॉस्टसह मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ प्रस्तुतचा अर्ज वादीवर रक्कम रुपये १५००/– कॉस्ट बसवून मंजुर करण्यात आला.

२. वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आला.

३. कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा प्राधिकरणला देण्यात यावी.

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.07.06 11:31:46 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |